**महाराष्ट्र शासन**

**शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय**

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दूरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क्र.dydpune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com


---

जा.क्र.शिउसं/पी.ए. स्पेशल /शै.सहली /पुवि/२०१८-१९/0304 दिनांक :- / ०९ /२०१८.

11 OCT 2018

प्रति,

मुख्याध्यापक / प्राचार्य

सर्व प्राथमिक / माध्यमिक / उच्च माध्यमिक विद्यालये /

कनिष्ठ महाविद्यालये, अहमदनगर / पुणे / सोलापूर.

**विषय:- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजनाबाबत...**

उपरोक्त संदर्भिय विषयानुसार आपणांस सर्वांना कळविण्यांत येते की, दरवर्षी प्रस्तुत कार्यालयास तसेच जिल्हा स्तरावर आपल्या कडून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक सहली आयोजनाबाबत परवानगीसाठी प्रस्ताव प्राप्त होत असतात.

शैक्षणिक सहलीचे ठिकाण मात्र पर्यटन, मनोरंजनात्मक स्थळी तसेच विद्यार्थ्यांचे अपघात होतील अशा निसर्गरम्य स्थळी आयोजन केलेले असल्याने, वरिष्ठ कार्यालयांनी प्रस्तांवाना परवानगी दिल्यास तसेच काही दुर्दैवाने सहलीबाबत विद्यार्थ्यांच्या बाबतीत वाईट घटना घडल्यास परवानगी देणा-या कार्यालयांना जबाबदार धरले जाते, मा. आयुक्तालय व मा. संचालनालयाकडून विनाकारण परवानगी देणा-या कार्यालयांना दंडात्मक कारवाईस सामोरे जावे लागते.

त्या अनुषंगाने आपणांस सर्वांना सदर पत्रानुसार सूचित करण्यात येते की, चालू शैक्षणिक वर्षी फक्त विद्यार्थ्यांच्या वैयक्तिक विकासात्मक तसेच ज्ञानात भर पडेल अशा शैक्षणिक, अभ्यासात्मक , संशोधनात्मक स्थळी / ठिकाणीच आपणामार्फत विद्यार्थ्यांचे शैक्षणिक सहलींचे आयोजन करण्यात यावे. सहलीचे कारण व ठिकाण योग्य वाटल्यास प्रस्तुत कार्यालयामार्फत परवानगी दिली जाईल. शैक्षणिक सहलीचे ठिकाण मात्र पर्यटन, मनोरंजनात्मक स्थळी तसेच विद्यार्थ्यांचे अपघात होतील अशा निसर्गरम्य स्थळी आयोजन केल्याचे प्रस्तावात आढळून आल्यास संबंधित प्रस्ताव सादर करणा-या तसेच विनापरवानगीने परस्पर सहल आयोजन करणा-या मुख्याध्यापकांवर तात्काळ कडक कारवाई करण्यात येईल.

वरील प्रमाणे दिशा निर्देशानुसारच शैक्षणिक सहलींचे आयोजन केलेले असल्यास, फक्त अशाच प्रस्तावांना प्रस्तुत / वरिष्ठ कार्यालयांकडून परवानगी देण्यात येईल, तसेच आयोजन केल्यानंतर सहलीबाबत कुठलाही अनुचित प्रसंग घडल्यास प्रस्तुत कार्यालय त्यासाठी जबाबदार राहणार नाही. त्यासाठी संबंधित मुख्याध्यापक व प्राचार्य हेच जबाबदार राहतील याची सर्व शालेय प्रशासन तसेच मुख्याध्यापक / प्राचार्य यांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

**प्रस्तावासोबत आवश्यक खालीलप्रमाणे कागदपत्रे जोडावीत.**

१.प्राचार्यांचे शिफारस पत्र.
२.प्राचार्यांचे १००च्या बॉण्ड पेपरवरील हमीपत्र.
३.विद्यार्थ्यांची यादी सही शिक्क्यानिशी.
४.ठिकाणाबाबतची माहिती.
५.संस्था व्यवस्थापनाची परवानगीचे पत्र.
६.बस बाबत माहिती / विद्यार्थ्यांच्या यादीसह आर टी ओ पासिंग परवाना.
७.विद्यार्थ्यांच्या विमाबाबत प्रती.
८.पालकांचे व विद्यार्थ्यांचे संमतीपत्र.
९.सहलीचे एकूण अंतर व कालावधी.
१०.प्रथमोपचार पेटीबाबत माहिती.
११.विद्यार्थ्यांचा रक्तगटाबाबतची माहिती.
१२.सहलीसाठी विद्यार्थी शारीरिक दृष्टया सक्षम असल्याचे वैद्यकीय प्रमाणपत्रे.

MBaut

(मिनाक्षी राऊत),
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग, पुणे

**प्रत:-**

शिक्षणाधिकारी,(माध्यमिक/प्राथमिक/निरंतर), जिल्हा परिषदा, पुणे विभाग, पुणे अहमदनगर / सोलापूर / पुणे , गटशिक्षणाधिकारी, पंचायत समित्या, पुणे विभाग, पुणे , शिक्षण मंडळ प्राथमिक / माध्यमिक, सर्व मनपा व नगर पालिका शिक्षण मंडळ, पुणे विभाग, पुणे यांना योग्य त्या कार्यवाहीसाठी